# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः 10.04.2026** **वारः शुक्रवार**

---

1. आसाम, केरलम आणि पुदुचेरी विधानसभा निवडणुकांसाठी शांततेत मतदान
2. इराणसोबतच्या युद्धबंदीच्या परिणामकारतेबाबत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून साशंकता व्यक्त
3. भारतात वार्षिक सौर वीजनिर्मितीत आतापर्यंतची सर्वाधिक वाढ
4. भारताची मीनाक्षी गोयत वरिष्ठ आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत

**मतदान**

आसाम, केरलम आणि पुदुचेरी विधानसभा निवडणुकांसह तीन राज्यांतील चार विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकांसाठी काल शांततेत मतदान झालं. निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार, आसाममध्ये 85 पूर्णांक 38 टक्के तर पुदुचेरीमध्ये जवळपास 90 टक्के मतदान झालं. दोन्ही राज्यातली मतदानाची ही आतापर्यंतची सर्वाधिक टक्केवारी आहे. केरळमध्येही 78 टक्क्यांपेक्षा जास्त मतदान नोंद झालं. कर्नाटकमधील बागलकोट आणि दावणगिरी दक्षिण या विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीसाठी साठ टक्क्यांच्या वर मतदान नोंदवलं गेलं, तर नागालँडमधील कोरिडांग जागेच्या पोटनिवडणुकीत 83 टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झालं. ही मतदान प्रक्रिया सुरू असताना मुख्य निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार डॉक्टर एस.एस. संधू आणि डॉक्टर विवेक जोशी या अन्य दोन निवडणूक आयुक्तांसमवेत थेट वेबकास्टिंगद्वारे या प्रक्रियेचं निरीक्षण करत होते. यंदा प्रथमच या भागांतील सर्व मतदान केंद्रांचं वेबकास्टिंग करण्यात आलं. याशिवाय सर्व इव्हीएम मतपत्रिकांवर उमेदवारांची रंगीत छायाचित्रं, मतदारांना त्यांचे मोबाईल फोन ठेवण्यासाठी खास सोय, नव्याने डिझाईन केलेल्या मतदार माहितीपत्रिका, प्रत्येक मतदान केंद्रावर 12 शे मतदारांची मर्यादा अशा मतदारस्नेही उपाययोजनाही या निवडणुकांमध्ये प्रथमच राबवण्यात आल्या.

दरम्यान तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी विविध राजकीय पक्षांच्या वरिष्ठ नेते प्रचारसभा घेत असल्यानं या दोन्ही राज्यांमध्ये प्रचाराला चांगलाच वेग आला आहे. भाजपचे वरिष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल बंगालमध्ये हल्दिया, असनसोल आणि सुरी या तीन मतदारसंघात प्रचारसभा घेतल्या तसंच असनसोल इथं जोरदार रोड शो देखील केला. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचेही राज्यात अनेक ठिकाणी प्रचारदौरे सुरू आहेत. राज्यात तृणमूल काँग्रेसचेच सरकार पुन्हा सत्तेत येईल असा विश्वास त्या प्रचारसभांमध्ये व्यक्त करत आहेत. तामिळनाडूतही प्रचार शिगेला पोहोचला असून भाजपचे केंद्रीय पातळीवरील वरिष्ठ नेते राज्यात प्रचारसभा घेत आहेत. तर सत्तारुढ द्रमुक आणि अण्णा द्रमुकसह मुख्य विरोधी पक्षांचे सर्व प्रमुख नेते संपूर्ण राज्यातील मतदारसंघ पिंजून काढत आहेत.

**बारामती निवडणूक**

महाराष्ट्राच्या बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीतून काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी काल आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याप्रती आदर दर्शवण्यासाठी काँग्रेसने आपला उमेदवार मागे घेतल्याचं काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी वार्ताहरांना सांगितलं. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत याबाबत अधिक माहिती दिली. दरम्यान, बारामती पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी 53 पैकी 30 उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले;

त्यामुळे आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह 23 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी सात उमेदवार रिंगणात आहेत. या दोन्ही मतदारसंघात 23 एप्रिलला मतदान होणार आहे

**ट्रम्प-चिंता**

इराण होर्मुझच्या सामुद्रधुनीतून खनिज तेलाच्या सुरळित वाहतुकीसंदर्भात कबूल केलेल्या अटींपासून फारकत घेत असल्याचा आरोप करत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणबरोबर सध्या केलेल्या युद्धविरामाच्या परिणामकारकतेबाबत चिंता व्यक्त केली आहे. इराण तेलवाहू जहाजांच्या वाहतुकीस मुभा न देण्याची अत्यंत चुकीची गोष्ट करत आहे, अशा शब्दात ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील संदेशात नाराजी व्यक्त केली आहे. जगातील हा अत्यंत महत्त्वाचा सागरी मार्ग पार करणाऱ्या जहाजांकडून शुल्क वसुलीबद्दल त्यांनी इराणला इशारा दिला आहे.

या युद्धबंदीपूर्वी या आठवड्याच्या सुरुवातीला तेहेरानवर अमेरिकेनं केलेल्या हल्ल्यात जखमी झालेले इराणचे ज्येष्ठ नेते आणि माजी परराष्ट्र मंत्री कमाल खराझी यांचं निधन झालं. या हल्ल्यामध्ये त्यांच्या पत्नीचाही मृत्यू झाला होता. खराझी इराणमधील प्रमुख नेत्यांपैकी होते.

दरम्यान या संघर्षासंदर्भात आणखी एक लक्षणीय घडामोड म्हणजे, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी लेबेनॉनशी युद्धबंदीसंदर्भात थेट वाटाघाटी सुरू करण्याचे अधिकृत आदेश दिले आहेत. इराणचं पाठबळ असलेल्या हिजबुलाह गटाला शस्त्रत्याग करायला लावणं आणि उभय देशांमधील संबंध सुरळित करण्याच्या शक्यतांचा शोध घेणं हा या वाटाघाटींचा उद्देश आहे. या प्रस्तावित वाटाघाटी पुढील आठवड्यात वॉशिंग्टन इथं होण्याची शक्यता आहे. दोन्ही बाजूंच्या वरिष्ठ राजनयिक प्रतिनिधींचा या चर्चेत सहभाग असण्याची अपेक्षा आहे. मात्र लेबेनॉननं यावर अद्याप काहीही अधिकृत प्रतिसाद दिलेला नाही.

**इस्रायल-पाक**

पश्चिम आशियातील संघर्षासंदर्भात या घडामोडी घडत असताना पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा असिफ यांनी केलेल्या वक्तव्यावर इस्रायलनं कठोर शब्दात टीका केली आहे, तसंच हा तणाव दूर करण्यातील तटस्थ मध्यस्थ म्हणून पाकिस्तानच्या विश्वासार्हतेबद्दलही प्रश्न उपस्थित केला आहे. कोणत्याही सरकारकडून विशेषतः स्वतःला शांततेचा मध्यस्थ म्हणवून घेणाऱ्या सरकारकडून इस्रायलचा विनाश चिंतला जाणं पूर्णतः अस्वीकार्य आहे, असं इस्रायलच्या पंतप्रधान कार्यालयाच्या निवेदनात म्हटलं आहे. असिफ यांनी समाजमाध्यमावर इस्रायलच्या विरोधात केलेल्या अत्यंत वादग्रस्त टिप्पणीनंतर इस्रायलनं ही प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

**सौरऊर्जा क्षमता**

आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये भारताने आपल्या सौरऊर्जा क्षमतेत सुमारे 45 गिगावॅट्सची वाढ नोंदवली असून ही आतापर्यंतची सर्वाधिक वार्षिक वाढ ठरली आहे, असं  केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आपल्या समाजमाध्यमावरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.  ही कामगिरी ऊर्जा सुरक्षा,शाश्वत विकास आणि 'विकसित भारत' या संकल्पनेप्रती भारताची भक्कम बांधिलकी दर्शविणारी असून राजस्थान,गुजरात आणि महाराष्ट्र या राज्यांनी या मध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असंही जोशी यांनी म्हटलं आहे. मार्च 2026 मध्ये देशाने 6 पूर्णांक 65 गिगावॅट्स सौर ऊर्जा क्षमतेची नोंद केली; एकाच महिन्यातझालेली ही आतापर्यंतची सर्वाधिक सौर ऊर्जा निर्मिती  असून या टप्प्यानं भारताच्या अधिक स्वच्छ,हरित आणि आत्मनिर्भर भविष्याकडे होणाऱ्या संक्रमणाला गती दिली आहे.

**मॉरिशस**

'भारत आणि मॉरिशस यांच्यातील भागीदारीमध्ये गेल्या वर्षभरात लक्षणीय प्रगती झाली असून दोन राष्ट्रांमधील दृढ ऐतिहासिक संबंध, परस्परविश्वास आणि वाढते सहकार्य याचंच हे प्रतिबिंब आहे', असं भारताचे परराष्ट्र

व्यवहारमंत्रीडॉक्टर एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. नवव्या 'इंडियन ओशनकॉन्फरन्स' अर्थात हिंद महासागर परिषदेत सहभागी होण्यासाठीडॉ. जयशंकर कालच मॉरिशसमध्ये दाखल झाले असून पोर्ट लुईस इथं मॉरिशसचे पंतप्रधाननवीन रामगुलाम यांची भेट घेतल्यानंतर ते काल प्रसारमाध्यमांशी बोलत होते. रामगुलाम यांच्याशीझालेल्या चर्चेत उभय देशांमधील सागरी सहकार्य, विकासभागीदारी, आरोग्य, शिक्षण, क्षमता बांधणी आणि दोन्ही देशांतील जनतेचे परस्पर संबंध अशा विविध क्षेत्रांचा समावेश होता.

**मिस्री-चर्चा**

देशाचे परराष्ट्र व्यवहार सचिव विक्रम मिस्री यांनी त्यांच्या अमेरिका दौऱ्यात काल वॉशिंग्टन डीसी इथल्या धोरणात्मदृष्ट्या महत्त्वाच्या समुदायांच्या प्रमुख नेत्यांशी चर्चा केली. सध्याच्या भू-राजकीय घडामोडी आणि त्यांचा जागतिक ऊर्जा, अन्न आणि आर्थिक सुरक्षेवर होणारा परिणाम या मुद्द्यारही त्यांनी चर्चा केली.

**होमिओपॅथी दिन**

आज जागतिक होमिओपॅथी दिन साजरा होत आहे. होमिओपॅथी या उपचारपद्धतीचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनेमान यांच्या जयंतीदिनी म्हणजे दरवर्षी 10 एप्रिलला हा दिवस साजरा केला जातो. 'शाश्वत आरोग्यासाठी होमिओपॅथी' ही या वर्षीच्या जागतिक होमिओपॅथी दिनाची संकल्पना आहे.

**युद्धविराम**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी आज युक्रेनमध्ये ऑर्थोडॉक्स इस्टरच्या सुट्टीनिमित्त 32 तासांच्या युद्धविरामाची घोषणा केली. यापूर्वी युक्रेनचे अध्यक्ष व्लादिमीर झेलेन्स्कीयांनी हा सण साजरा करण्यासाठी संघर्ष थांबवण्याचा प्रस्ताव दिला होता. क्रेमलिनने जारी केलेल्या पुतिन यांच्या आदेशानुसार रशियन सैन्यालाशनिवारपासून रविवार अखेरपर्यंत युद्धविराम पाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.पुतिन यांच्या घोषणेवर कीवकडून कोणतीही तात्काळ प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.यापूर्वी युद्धविराम घडवून आणण्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा फारसा परिणाम झाला नव्हता. रशियानंगेल्या वर्षी अमेरिका आणि युक्रेनने सुचविलेला 30 दिवसांचा बिनशर्त युद्धविरामाचा प्रस्तावही नाकारला होता. परंतु मॉस्कोनं या दरम्यान अनेक छोटे, एकतर्फी युद्धविराम जाहीर केले आहेत.

**कुस्ती स्पर्धा**

किर्गिझिस्तानमधील बिश्केक इथं सुरू असलेल्या वरिष्ठ आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत दोन वेळा राष्ट्रीय विजेती ठरलेल्या पण या स्पर्धेत पिछाडीवर असलेल्या मीनाक्षी गोयतनं जोरदार मुसंडी मारत दक्षिण कोरियाच्या सियोयंग पार्कचा पराभव करून महिलांच्या 53 किलो वजनी गटाची अंतिम फेरी गाठली. दुसरीकडे हंसिका लांबाने 55 किलो वजनीगटात विजय मिळवत भारताच्या पदकांमध्ये आणखी एका कांस्यपदकाची भर घातली. तत्पूर्वी स्पर्धेच्या पहिल्या तीनदिवसांत पुरुषांच्या 'ग्रीको-रोमन' गटातील कुस्तीपटूंनी दोन रौप्य आणि तीन कांस्य पदकं पटकावली होती.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार...